**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना**
**अधिनियम, १९६६**
**कलम ३७(२) अन्वयेची अधिसूचना.**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**दिनांक :- १८ फेब्रुवारी २०२०.**

**अधिसुचना**

**क्रमांक-टिपीएस-१२१७/३१५७/प्र.क्र.१४/१९/नवि-१२.**

ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारीत विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख "उक्त विकास योजना" असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम ३१ (१) अन्वये शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्रमांक टिपीएस-१२९७/१३१९/ प्र.क्र.१४८/९७/नवि-१२, दिनांक ४ ऑक्टोंबर, १९९९ (यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिसुचना" असा करण्यात आला आहे) अन्वये भागश: मंजूर झाली असून, ती दिनांक २२ नोव्हेंबर, १९९९ पासून अंमलात आली आहे आणि उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) मधील तरतूदीनुसार शासन, नगर विकास विभागाची अधिसूचना क्र.टिपीएस-१२०१/२७४/प्र.क्र.२८/२००९/नवि-१२, दिनांक ३ एप्रिल, २००३ रोजी मंजूर झाली असून दि. १४ मे, २००३ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमधील सेक्टर ३ च्या विकास योजनेनुसार मौ. नौपाडा येथील स. नं.१४१पै., १४२पै., १४४पै. ही जमीन भागश: विद्यमान मनोरुग्णालय हॉस्पीटलखालील सार्वजनिक/निमसार्वजनिक वापर विभाग, भागश: आ.क्र.३-पार्किंग, भागश: आ.क्र.४-पार्कींग, भागश: आ.क्र.१-पंपींग स्टेशन, भागश: विद्यमान माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान व भागश: १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता या प्रस्तावांनी व सेक्टर १ च्या विकास योजनेनुसार भागश: आ.क्र.१-म्युनिसिपल प्राथमिक शाळा, भागश: आ.क्र.३-पार्कींग, भागश: १२.०० मी. व १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता या प्रस्तावानी बाधीत होत असुन भागश: क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त जमिन" असा करण्यात आला आहे.);

आणि ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिकेने (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त महानगरपालिका" असा करण्यात आला आहे) उक्त अधिनियमातील कलम ३७(१) अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन उक्त जमीनीपैकी काही क्षेत्र रेल्वे स्टेशन करिता आरक्षित करण्याचा व त्याअनुषंगाने १८.०० मी. रुंद रस्ता दर्शविण्याचा, आ.क्र.३-पार्कींग, आ.क्र.१-पंपिंग स्टेशन, आ.क्र.१-म्युनिसिपल प्राथमिक शाळा या आरक्षणाच्या क्षेत्रामध्ये बदल करण्याचा व नवीन बस टर्मिनसचे आरक्षण तसेच १२.०० मी. , १८.०० मी. व २४.०० मी. रुंद विकास योजना रस्त्यांची आखणी दर्शविण्याचा फेरबदल प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी दि.१०/११/२०१७ च्या पत्रान्वये सादर केला आहे. (यापुढे ज्यांचा उल्लेख "प्रस्तावित फेरबदल" असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर प्रस्तावित फेरबदल मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोटकलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने शासनास प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करुन शासन उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदल प्रस्ताव मंजूर करीत आहे आणि त्यासाठी उक्त विकास योजना मंजूरीच्या अधिसुचनेतील फेरबदलाच्या अनुसुचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे;

**नोंद**

"मौजे नौपाडा येथील स. नं.१४१पै., १४२पै., १४४पै., यापैकीची भागश: जमीन रेल्वे स्टेशन व बस टर्मिनस करिता आरक्षित करण्यात येत आहे. आ.क्र.३-पार्कींग, आ.क्र.१-पंपींग स्टेशन आणि आ.क्र.१-म्युनिसिपल प्राथमिक शाळा या आरक्षणाच्या आकारमानात /क्षेत्रफळात बदल करण्यात आला आहे. तसेच १२.०० मी., १८.०० मी. व २४.०० मी. रुंद विकास योजना रस्ते नव्याने प्रस्तावित करण्यात आले आहेत. सदरचे सर्व फेरबदल विकास योजना भाग नकाशावर दर्शविण्यात आले आहेत."

**०२.** सदरचा मंजूर फेरबदल ही अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनाकांपासून अंमलात येईल.

**०३.** उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा नागरीकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खाली नमूद कार्यालयामध्ये एक महिन्याच्या कालावधीकरिता उपलब्ध राहील.

१) आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

२) सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी-मुंबई.

३) सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा, जि. ठाणे.

**०४.** सदर फेरबदलाची अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

Ashok Kashirao Khandekar

Digitally signed by Ashok Kashirao Khandekar
DN: CN = Ashok Kashirao Khandekar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Urban Development Department
Date: 2020.02.26 12:19:36 +05'30'

**(अशोक का. खांडेकर)**

**कार्यासन अधिकारी**

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**
**Notification under section 37(2) of the Act.**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**
**4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai-400 032.**
**Dated :- 18th February 2020.**

**NOTIFICATION**

**No. TPS-1217/3157/C.R.14/19/UD-12,**

Whereas, the Revised Development Plan of the city of Thane (hereinafter referred to as “the said Development Plan”) has been sanctioned partly by the Government in the Urban Development Department, under Section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as “the said Act”) vide Notification No. TPS-1297/1319/CR-148/97/UD-12, dated the 4th October, 1999 (hereinafter referred to as “the said Notification”) and has come into force with effect from 22nd November, 1999 and the Excluded Part of the said Development Plan has been sanctioned by the Government in Urban Development Department under Section 31(1) of the said Act, vide Notification No. TPS-1201/274/CR-28/2009/UD-12, dated the 3rd April, 2003 and has come into force with effect from 14th May, 2003;

And whereas, in the Development Plan of Sector-3 of the said Development Plan, land bearing S. No. 141(pt.), 142(pt.), 144(pt.) of Village Naupada is partly included in Public/Semi Public Zone for Mental Hospital, partly affected by Site No.3-Parking, partly affected by Site No.4-Parking, partly affected by Site No.1-Pumping Station, partly affected by existing Secondary School and Play Ground and partly affected by 18.00 mt. wide Development Plan Road and as per the Development Plan of the Sector-1 of the said Development Plan, partly affected by Site No.1-Municipal Primary School, partly affected by Site No.3-Parking, partly affected by 12.00 mt. and 18.00 mt. wide Development Plan Road and partly included in Residential Zone (hereinafter referred to as "the said land");

And whereas, Thane Municipal Corporation (hereinafter referred to as "the said Municipal Corporation"), after following the legal procedure under Sub-section (1) of Section 37 of the said Act, has submitted a proposal for modification in the said Development Plan so as to reserve the said land partly for Railway Station along with 18.00 mt. wide road, to change the area of Site No.3-Parking, Site No.1-Pumping Station, Site No.1-Municipal Primary School, to reserve the

said land partly for new reservation of Bus Terminus and 12.00 mt., 18.00 mt. and 24.00 mt. wide Development Plan Road, vide letter dated 10/11/2017 (hereinafter referred to as "the Proposed Modification");

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that it is necessary to sanction the Proposed Modification;

Now therefore, in exercise of the powers conferred under Sub-section (2) of Section 37 of the said Act and all other powers enabling it in that behalf, the State Government hereby sanctions the Proposed Modification as described below:-

"In the Schedule of modifications appended with the said Notification, after the last entry, the following new entry shall be inserted viz.:-

**ENTRY**

“Land bearing S. No.141(pt.), 142(pt.), 144(pt.) of Village Naupada is partly reserved for Railway Station and Bus Terminus. The area and shape of Site No.3-Parking, Site No.1-Pumping Station and Site No.1-Municipal Primary School are modified. Also new 12.00 mt., 18.00 mt., and 24.00 mt. wide Development Plan Road are proposed. All this modifications are shown on the part plan of the said Development Plan.”

**02.** The date of publication of this Notification in the Maharashtra Government Gazette is fixed as the date of coming into force of this sanctioned modification.

**03.** The Part Plan of aforesaid sanctioned modification shall be made available for inspection by the general public during office hours on all working days at the following offices for a period of one month:-

i) The Commissioner, Thane Municipal Corporation, Thane.
ii) The Joint Director of Town Planning, Konkan division, Konkan Bhavan, Navi Mumbai.
iii) The Assistant Director of Town Planning, Thane Branch, Thane.

**04.** This notification shall also be published on the Government Website at www.maharashtra.gov.in

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

Ashok Kashirao Khandekar

Digitally signed by Ashok Kashirao Khandekar
DN: CN = Ashok Kashirao Khandekar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Urban Development Department
Date: 2020.02.26 12:19:51 +05'30'

**(Ashok K. Khandekar)**
**Section Officer**